# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१
फोन नं.(०२०) २६०५०६४१

**ई-मेल आयडी :-** comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/तालुका-प्रभाग सनिअ आदेश/सन २०१४/1569 दि. २७/१०/२०१४

**वाचावे :** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३
३. महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ अधिसूचना दिनांक ११ सप्टेंबर २०१४
४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ नियम २(२०)

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दि.१३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार, राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणा मार्फत घेण्याची तरतुद आहे, आणि,

ज्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे, आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११/०९/२०१४ अन्वये अधिसूचीत करण्यात आलेले आहेत, आणि सदर नियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी नियम क्र.२(२०) नुसार तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांची व्याख्या करण्यात आलेली आहे , त्यानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.झरीझामणी, जि.यवतमाळ यांना त्यांचे वैधानिक अधिकार क्षेत्रात तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

त्याअर्थी, सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण , महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ नियम २(२०) नुसार खालील प्रमाणे स्तंभ ३ मधील अधिकारी यांना स्तंभ ४ मधील त्यांचे वैधानिक अधिकार क्षेत्रातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | यवतमाळ | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झरीझामणी, जि.यवतमाळ | संपूर्ण झरीझामणी तालुका जि.यवतमाळ |

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे निर्देशानुसार.**

28/10/14

**(डॉ.ए.बी.जोगदंड)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रति,**
संबंधीत तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी

**प्रत माहितीस्तव :**

३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :**

६. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे
९. मा.आयुक्त (दुग्धविकास), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस , वरळी मुंबई ४०० ०१८.
१०. मा.संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर.